# ई - पोलीस पत्रिका

दि.१८/०९/२०२४ अनु.क्र.१६९

## (अमरावती शहर पोलीसांचीर०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/पशा-३/अर्जित रजा मंजुरी/८०४१/२०२४ अमरावती शहर दिनांक ०५/०९/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील नमुद मंत्रालयीन कर्मचारी यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा, (रजा) नियम १९८१ मधील ५० अन्वये **अर्जीत रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक | अर्जीत रजा कालावधी | अतिरिक्त प्रभार |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. मंदा धवसे, प्रमुख लिपीक | लेखा शाखा | दि.०६/०९/२०२४ ते दि.१७/०९/२०२४ एकुण १२ दिवस मुख्यालय सोडण्याची परवागीसह | श्री. संगीता तायडे, प्रमुख लिपीक |

## बदली

**१.पोआअ/पशा-३/सा.बदल्या-२०२४/कुरवाळे वश्रेलि/कार्यमुक्त/७९६३/२०२४ अमरावती शहर दिनांक ०४/०९/२०२४**

## आदेश

विशेष पोलीस महानिरिक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे आदेश क्र. अप/कक्ष-४अ/ जिल्हा संवर्ग/स.बदल्या-२०२४/वश्रेलि/२०२४/१७९५, दि.३१/०८/२०२४ अन्वये अमरावती परिक्षेत्रांतर्गत जिल्हा लिपीक संवर्गातील वरीष्ठ श्रेणी लिपीकांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे.

| अ.क्र | वरिष्ठ श्रेणी लिपीकांचे नाव | सध्या नियुक्तीचे कार्यालय | बदलीवरील नवीन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री. नामदेव गोपाळराव कुरवाळे | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | पोलीस अधीक्षक, यवतमाळ |

श्री. नामदेव गोपाळराव कुरवाळे,वरिष्ठ श्रेणी लिपीक यांची बदलीने पदस्थापना झाल्याने बदलीच्या ठिकाणी हजर होण्या करीता ते दि.६/०८/२०२४ पासुन रजेवर असल्याने त्यांना या कार्यालयाचे आस्थापनेवरुन दिनांक ०४/ ०९/२०२४ चे म.नंतर स्थित कार्य**मुक्त** करण्यात येत आहे.

श्री. नामदेव गोपाळराव कुरवाळे, वरीष्ठ श्रेणी लिपीक यांचेकडील अर्ज शाखा सहायक या कार्यासनाचा अतिरिक्त प्रभार श्री. प्रकाश सोळंके, प्रमुख लिपीक अर्ज शाखा यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

**२.पोआअ/पशा-१/पदोन्नतीवर स.पो.आ./हजर/८२६३/२०२४ अमरावती शहर दिनांक १२/०९/२०२४**

## आदेश

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन आदेशक्र.रापोसे-०१२४/प्र.क्र.६९/भाग-२/पोल-१अ, दिनांक २०/०८/२०२४ व पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२/१०२०/निनिसु-२०२३-२०२४/१७४/२०२३, दिनांक २०/०८/२०२४ अन्वये खालील नमुदपोलीस निरीक्षक यांचीसहायक पोलीस आयुक्त पदोन्नतीवर पदस्थापनाकरण्यात आली आहे.

पोलीस उप आयुक्त, नायगाव, मुंबई यांचे आदेशक्र.पोउआ/सपोव/पदोन्नती- कार्यमुक्तता/ ४९१/२०२४ दिनांक ०२/०९/२०२४ अन्वये श्री. संजय राधूखताळे, पोलीस निरीक्षक यांना दिनांक ०२/०९/२०२४ रोजी बदलीचे ठिकाणी हजर होणेकरीता कार्यमुक्त करण्यात आले. ते दि. २७/०८/२०२४ ते ११/०९/२०२४ पर्यंत रुग्णनिवेदनात होते व दि. १२/०९/२०२४ रोजी म.नंतर पोलीस आयुक्त, अमरावती शहर या घटकात वैद्यकिय प्रमाणपत्र घेवूनहजर झाले आहेत.

खालील नमुद पोलीस अधिकारी यांना सहायक पोलीस आयुक्त, अमरावती शहर या पदी पदोन्नतीवर हजरकरण्यात येत असूनत्यांची नेमणुक खालील नमुद केलेल्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेशा पर्यंत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | आदेशातील अ.क्र. | सहायक पोलीस आयुक्त यांचे नाव | बदलीपूर्व नेमणुक | पदोन्नतीवर नेमणूकीचे ठिकाण व हजर दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | ७४ | श्री संजय राधु खताळे | पोलीस निरीक्षक, मुंबई शहर | सहायक पोलीस आयुक्त, अमरावती शहर दिनांक १२/०९/२०२४ चे म.नंतरहजर<br>**नेमणुक- सहायक पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग, अमरावती शहर** |

श्री. संजय राधु खताळे, सहायक पोलीस आयुक्त यांचा दि. २७/०८/२०२४ ते १२/०९/२०२४ पर्यंतचा कालावधी हात्यांचे सेवापुस्तक प्राप्त झालेनंतर नियमित करण्यात येईल.

**३.पोआअ/पशा-३/प्र.ब./वसुले/कश्रेलि/८४१६/२०२४ अमरावती शहर दिनांक २०/०९/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील कार्यरत खालील नमुद कनिष्ठ श्रेणी लिपीक यांची प्रशासकिय कारणास्तव त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यासनावर तापुरत्या स्वरुपात पुढील आदेशा पर्यंत नेमणुक करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | मंत्रालयीन कर्मचारी यांचे नाव व पदनाम | सद्याचे नेमणुकीचे कार्यासन | नवीन नेमणुकीचे कार्यायन |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुमित बाबाराव वसुले, कनिष्ठ श्रेणी लिपीक | पोलीस कल्याण निधी लिपीक , लेखा शाखा | परवाना शाखा |

उपरोक्त नमुद लिपीक यांनी तात्काळ आपले नविन नेमणुकीचे ठिकाणी हजर व्हावे. तसेच आपणा कडे पोलीस कल्याण निधी लिपीक या कार्यासनाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेशापर्यत सोपविण्यात येत आहे.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## निरंक

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**०१.पोआअश/प्रलि पशा/बिसं/अति.पदे प्राप्त /७७४१/२०२४अमरावती शहर दिनांक २७/०८/२०२४**

**संदर्भ :-** (१) महाराष्ट्र शासन, गृहविभाग, शासन निर्णय, क्रमांक : पीडब्ल्यूएस-०५१९/प्र.क्र. ३५१/पोल-४ दिनांक २८ मार्च २०२२
(२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.६८१२/२०२२ दिनांक २१/०६/२०२२
(३) अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, म.रा.,पुणे यांचे पत्र क्रमांक आस्था-१/ई-७/स्थायी पदे सेवार्थ मध्येदर्शविण्या बाबत/१५४०/२०२४ दिनांक ०७/०५/२०२४

**विषय :-** पोलीस महासंचालक कार्यालयाच्या अधिनस्त अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, म.रा.,पुणे विभागांतर्गत ( सुधारित आकृतीबंध) नुसार विभागची पुनर्रचना केलेल्या एकुण ३८६९ पदे सेवार्थ मध्ये दर्शविण्याबाबत.

---ooo---

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय क्रमांक (१) नुसार पोलीस बिनतारी संदेश विभागाची पुर्नरचना करण्यात आली असुन त्यामध्ये पोलीस आयुक्त, अमरावती शहर या घटकाकरीता खाली नमुद केल्या प्रमाणे सध्या मंजुर असलेल्या पदांव्यतिरिक्त ज्यादा पदे प्राप्त झाली आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पूर्वीचे मंजुर पदे | पुनर्रचनेमध्ये प्राप्त पद | एकुण मंजुर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक / बिनतारी संदेश ( अभियांत्रिकी ) | ०१ | ०० | ०१ |
| २ | पोलीस उपनिरीक्षक / बिनतारी संदेश ( वाहतुक ) | ०१ | ०१ | ०२ |
| ३ | पोलीस उपनिरीक्षक / बिनतारी संदेश / अभियांत्रिकी ) | ०१ | ०१ | ०२ |
| ४ | सहायक पोलीस उपनिरीक्षक / रेडिओ यांत्रिकी | ०४ | ०० | ०४ |
| ५ | सहायक पोलीस उपनिरीक्षक / प्रमुख बिनतारी यंत्रचालक | ०३ | ०० | ०३ |
| ६ | पोलीस हवालदार / बिनतारी यंत्रचालक | ०६ | ०७ | १३ |
| ७ | पोलीस हवालदार / विजतंत्री | ०१ | ०० | ०१ |
| ८ | पोलीस हवालदार / स्तंभ कागारीर | ०१ | ०० | ०१ |
| ९ | पोलीस नाईक / कर्मशाळा मदतनीस | ०० | ०१ | ०१ |
| १० | पोलीस शिपाई / कर्मशाळा मदतनीस | ०० | ०२ | ०२ |
| **एकुण** | | **१८** | **१२** | **३०** |

याबाबतची माहिती संदर्भीय पत्र क्रमांक (२) अन्वये आपले शाखेस देण्यात येवून त्याबाबतचा अभिलेख अदयावत ठेवण्याबाबत कळविण्यात आले होते.

संदर्भीय पत्र क्रमांक (३) ची परिपत्रकाची प्रत या सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तरी सदर परिपत्रकामध्ये दिलेल्या निर्देशा प्रमाणे सदरची पदे सेवार्थमध्ये दर्शविण्या बाबतची कार्यवाही करण्यात येवून त्या बाबतचा पुर्तता अहवाल अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, म.रा.,पुणे यांना सादर करुन त्याची एक प्रत या शाखेस देण्यात यावी.

**सहपत्र -२**

**०२.पोआअश/प्रलि पशा/वि.अ.गट-अ/सेवा समाप्त/७९६८/२०२४ अमरावती शहर दिनांक ०४/०९/२०२४**

**संदर्भ** :- (१) मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक : पोमसं/ २-अ/विधी अधिकारी- निवड मंडळ/२/२०१७ दि.०४/०९/२०२३

(२) या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोआअश/प्रलि- पशा/विधी अधि. गट-अ/२०२३/१११६४ दिनांक ०६/१०/२०२३

विषय :- विधी अधिकारी गट - अ या पदावरील सेवा समाप्तीबाबत.

## आदेश

श्री. पियुष अरुण पाचकवडे, यांची पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आस्थापनेवरील विधी अधिकारी, गट -अ, या पदावर संदर्भीय आदेश क्रमांक (१) अन्वये कंत्राटी पध्दती निव्वळ ११ महिन्यांकरीता विधी अधिकारी गट - अ या पदावर नेमणुक करण्यात आली होती.

त्यान्वये श्री. पियुष अरुण पाचकवडे, हे या घटकात दिनांक ०६/१०/२०२३ रोजी विधी अधिकारी, गट - अ या पदावर हजर होण्यास आल्याने त्यांना संदर्भीय आदेश क्रमांक (२) अन्वये या घटकात हजर करुन घेण्यात आले होते. त्यानुसार त्यांचा कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याचा नेमणुकीचा कालावधी हा दिनांक ०६/१०/२०२३ ते ०५/०९/२०२४ पर्यत आहे.

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : पोमसं/१४-अ/६७/सर्वोच्च न्यायालय/८६/२०१४ दिनांक ०१/०९/२०१४ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक १९/०८/२०१४ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार कंत्राटी पदावरील विधी अधिकारी यांची सेवा कंत्राटी पदाचा कालावधीच्या पुढे सुरु ठेवण्यात येवू नये असे आदेश दिलेले असल्याने आपण या घटकात कंत्राटी पध्दतीने ११ -महिन्यांकरीता विधी अधिकारी गट - अ या पदावर कार्यरत असल्याने आपला कालावधी हा दि. ०५/०९/२०२४ रोजी संपणार असल्याने आपली सेवा दिनांक ०५/०९/२०२४ चे म.नंतर संपुष्टात आणण्यात येत आहे.

**०३.पोआअश/पशा-५/शास.निवासस्थान वाटप/८०२२/२०२४ अमरावती शहर दिनांक ०५/०९/२०२४**

# आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी शासकिय निवासस्थान मिळणेबाबत अर्ज केल्याने त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे शासकिय निवासस्थान मंजुर करण्यात येत आहे.निवासस्थानाचे वाटप खालील पोलीस अंमलदार यांना विहित नमुन्यात दिलेल्या माहीतीवर आधारीत असुन त्यांची आयुक्तालयाच्या बाहेर बदली झाल्यास त्यांनी निवासस्थान त्वरित सोडले पाहीजे व या कार्यालयात तशी लेखी सुचना दिली पाहीजे या अटीवर देण्यात येत आहे.

निवासस्थान वाटपाचे आदेश निघाल्या पासुन संबंधीतांनी ०७ दिवसाचे आत निवासस्थान ताब्यात घेतले पाहिजे किंवा तसे या कार्यालयास कळविले पाहीजे. निवासस्थानाचे विद्युत देयकाचे भुगतान कर्मचा-यांनी वेळीच केले पाहीजे व त्यासाठी ते स्वत: जबाबदार राहतील. तसेच राखीव पोलीस निरीक्षक / ठाणेदारांनी स्वत: लक्ष देणे जरुरीचे राहील. पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी निवासस्थान ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासुन त्यांचा घरभाडे भत्ता बंद करण्यात यावा. तसेच **शासन निर्णय वित्त विभाग**

**क्रमांक घभाव-२०२२/प्र.क्र.-७/सेवा-५, दिनांक १९/०१/२०२३ अन्वये पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या वेतनातुन नियमाप्रमाणे दरमहा अनुज्ञप्ती शुल्क कपात करण्यात यावी.**

| **अ. क्र.** | **पोलीस अंमलदार/ कर्मचारी यांचे नाव/बं.नं.** | **नेमणुक** | **मागणी करण्यात आलेले शासकीय निवासस्थान** |
|---|---|---|---|
| १ | मपोशि/१४६६ सपाना बेलोकार | पो,स्टे.फ्रेजरपुरा | पोलीस मुख्यालय अंतर्गत टी.बी. लाईन येथिल शासकिय निवासस्थान क्र.३९२ वाटप करण्यात येत आहे. |
| २ | पोशि/१६५८ बाळु पालवे | पो,स्टे.फ्रेजरपुरा | पोलीस मुख्यालय रिझर्व पोलीस लाईन येथिल शासकिय निवासस्थान क्र.३०८ वाटप करण्यात येत आहे. |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस